दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –६१ रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- ६१ sanday ८ November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4





टायगर ग्रुपच्या संकल्पनेतून १५१ ऊसतोड मजुरांची दिवाळी गोड..!

आशादत्त सेवाभावी संस्थेचा दीपावलीनिमित्त स्तुत्य उपक्रम ; किराणा, फराळ साहित्य व आकाशकंदिलांचे वाटप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सण-उत्सवांचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा, कष्टकरी ऊसतोड मजुरांचीही दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीतून आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अंबाजोगाई तालुक्यातील १५१ ऊसतोड मजुरांना दिवाळीनिमित्त किराणा साहित्य, फराळ साहित्य आणि आकाशकंदिलांचे वाटप करण्यात आले. टायगर ग्रुपची संकल्पना प्रत्यक्षात आणत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांची दिवाळी गोड झाली.

धनत्रयोदशीच्या निमित्ताने ग्रामीण भागातील ऊसतोड मजुरांना दीपावलीचा सण उत्साहात साजरा करता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. ऊसतोड मजूर हा आपल्या कष्टातून समाजाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणारा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, अनेकदा सण-उत्सवाच्या आनंदापासून हा घटक वंचित राहतो. ही जाणीव ठेवून संस्थेच्या वतीने १५१ कुटुंबांना दिवाळीसाठी आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष उमेशभाऊ पोखरकर म्हणाले की, ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांची दिवाळीही आनंदात आणि उत्साहात साजरी व्हावी, या भावनेतून दरवर्षी संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबविला जातो. समाजातील गरजू आणि कष्टकरी घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, हीच आमच्या सामाजिक कार्याची प्रेरणा आहे. या उपक्रमावेळी आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उमेशभाऊ पोखरकर, कोंडीराम पवार, आदित्य देशमुख, शिवम महाजन, रोहन कुलकर्णी, अभिजीत तोडकर यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता. कष्टकऱ्यांच्या दिवाळीत आनंदाचा प्रकाश पसरविणाऱ्या आशादत्त संस्थेच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.



आम्ही जनतेच्या सुखदुःखात सदैव सोबत - आ. विजयसिंह पंडित

रणवीर पंडित युथ फाऊंडेशने दुष्काळग्रस्त गरजू कुटुंबांची दिवाळी केली गोड

गेवराई (प्रतिनिधी)

दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक जाणिवेतून आमदार विजयसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त रणवीर पंडित युथ फाऊंडेशनच्या सौजन्याने गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून रणवीर पंडित युथ फाऊंडेशनची अधिकृत स्थापना करण्यात आली.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वसामान्य कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असून अनेकांच्या घरात सणासुदीच्या काळातही आर्थिक टंचाई जाणवत आहे. अशा कठीण प्रसंगी गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने किराणा किटचे वाटप करण्यात येत आहे. या किराणा किटच्या माध्यमातून त्यांच्या घरात दिवाळीचा गोडवा आणि आनंद निर्माण व्हावा, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. समाजातील गरजू घटकांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे. केवळ मदत करण्यापुरते नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक सुखदुःखात आम्ही कुटुंबातील सदस्य म्हणून सदैव सोबत आहोत, अशी भावना रणवीर पंडित यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला आमदार विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, नगरपरिषदेचे गटनेते शेख खाजाभाई, आरपीआयचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, अजय येवले आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी फाऊंडेशनचे सदस्य संदीप राजगुरू, संदीप मडके, आजिमभाई इनामदार, हसनुशेठ, राहुल काकडे, अमर बोराडे, राहुल मोटे, अजित काळे, अजय येवले, नवीद मशायक, किरण दाभाडे, बाळासाहेब दाभाडे यांच्यासह इतर सदस्य व मान्यवरांची उपस्थिती होती.रणवीर पंडित युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून आगामी काळात आरोग्यसेवा, गरजू व वंचित घटकांना मदत, सामाजिक उपक्रम तसेच विविध जनहिताची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची सुरुवात यापूर्वीच झाली असून, काही दिवसांपूर्वी फाऊंडेशनचे सदस्य अजित काळे यांनी सुशी वडगाव येथे नागरिकांसाठी मोफत पाणी टँकर सेवा सुरू केली होती. सामाजिक बांधिलकी जपत गरजूंच्या मदतीसाठी युवकांना एकत्र आणून सेवाभावी कार्याचा व्यापक विस्तार करण्याचा संकल्प या नव्या फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आला आहे. आमदार विजयसिंह पंडित यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गरजू कुटुंबांना दिवाळीचा आनंद देणारा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला.

थंडीपासून बचाव नाही, तर मायेची ऊब... युवाक्रांतीचा हात आजी-आजोबांच्या हातात.!

घाटसावळी वृद्धाश्रमात ब्लँकेट वाटप, अनेक डोळे पाणावले

बीड (प्रतिनिधी)

ज्यांनी आयुष्यभर दुसऱ्यांसाठी कष्ट केले, तीच माणसं आज वृद्धाश्रमात एकाकी जगत आहेत. त्यांच्या थंडीत कुडकुडणाऱ्या शरीराला फक्त ब्लँकेट नको होतं, तर कुणीतरी प्रेमाने जवळ यावं, हात हातात घ्यावा, “आम्ही आहोत” असं म्हणावं, एवढीच अपेक्षा होती. तीच माया घेऊन बीडची युवाक्रांती सेवाभावी संस्था घाटसावळीला पोहोचली.

श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था संचलित लोकनेते गोपीनाथराव मुंडे वृद्धाश्रम, घाटसावळी येथे युवाक्रांती सेवाभावी संस्थेच्या वतीने निराधार आजी-आजोबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. ब्लँकेट हातात देताना आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर हसू होतं, पण डोळ्यात मात्र कृतज्ञतेचं पाणी होतं. “पोरांनो, तुम्ही आलात, हेच खूप आहे,” असं म्हणत अनेकांनी आशीर्वाद दिले.

संस्थेचे अध्यक्ष सुहास पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्थेचे प्रमुख तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड होते, तर विशेष अतिथी म्हणून कैलास शेजाळ



उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना अध्यक्ष सुहास पाटील म्हणाले, “हा उपक्रम आम्ही फक्त सामाजिक बांधिलकी म्हणून करत नाही. ही आपली माणसं आहेत. समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून आम्ही इथे आलो आहोत. एक ब्लँकेट कदाचित छोटी गोष्ट वाटेल, पण त्या मागची माया खूप मोठी आहे.”

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजिनाथ शेरकर यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप शिवाजीराव फड यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल नेहरकर, वर्षा शेरकर, योगेश कुलकर्णी, गोरख फड, गीताराम गायकवाड, सहदेव फड यांनी परिश्रम घेतले. शेवटी सामूहिक पसायदानाने वातावरण आणखीनच भारावून गेलं. जाताना प्रत्येक आजी-आजोबा हेच म्हणत होते, “परत नक्की या.

२५ डिसेंबरला शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

प्रथम पारितोषिक २५ हजार, द्वितीय १५ हजार, तर तृतीय १० हजार रुपये

बीड (प्रतिनिधी)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शाळा प्रवेश दिनाला १२६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने नालंदा फाऊंडेशन, बीडच्या वतीने शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या २५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी तीन विषय निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये १) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षक : नव्या संधी, नवी आव्हाने' २) 'महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गुरु-शिष्य कार्यात्मक अनुबंध आणि ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना निर्मितीत योगदान या विषयांचा समावेश आहे.

सहभागी शिक्षकांना या तीन विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर ७ ते १० मिनिटांच्या कालावधीत आपले वक्तृत्व सादर करावे लागणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५



हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास १० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, दि. १ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत नावनोंदणी करता येणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आयोजकांच्या वतीने एक वेळ मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर तसेच विद्यापीठस्तरावरील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली नावनोंदणी करावी, असे आवाहन मुख्य संयोजक तथा नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी व सविस्तर माहितीसाठी ७९९०७६०१५१ आणि ९५६१८१७४७४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिपावली पाडवा निमित्त आडस येथे फराळाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे -रमेशराव आडसकर

केज/प्रतिनिधी

प्रतिवर्षा प्रमाणे लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर साहेबांची दिपावली पाडवा परंपरा कायम ठेवत याही वर्षी आडस येथील निवासस्थानी दि.१० नोव्हेंबर २०२६

वार मंगळवार रोजी सकाळी १०-३० वाजता केज, अंबाजोगाई,किल्ले धारुर,माजलगाव या तालुक्यातील



सरपंच, चेअरमन,शेतकरी, राजकीय,सामाजिक, उद्योग,पत्रकारिता या क्षेत्रातील सर्वांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले आहे.माजी आमदार बाबुरावजी आडसकर साहेबांच्या काळापासून सुरू असलेली ही परंपरा असुन पुढे ही त्यांचे सुपुत्र रमेशराव आडसकर यांनी हा सामाजिक स्नेह मेळावा आयोजित केला आहे.या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहाण्याचे आवाहन रमेशराव आडसकर,ऋषीकेश भैया आडसकर यांनी केले आहे.



जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड / जिल्हा प्रतिनिधी

दिवाळी, गुरुतागद्दी सोहळा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यात 8 नोव्हेंबर रोजी सकाळी 6 वाजेपासून ते 22 नोव्हेंबर 2026 रोजी रात्री 12 वाजेपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 37 (1) (3) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी किरण आंबेकर यांनी हे आदेश जारी केले आहेत.

दि. 8 नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन, त्यानंतर दिवाळी पाडवा व भाऊबीज हे सण साजरे होणार आहेत. तसेच गुरुद्वारा सचखंड येथे बंदीछोड दिवसानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. 9 नोव्हेंबर रोजी दिवाळीनिमित्त शीख समाजाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यात पंजाब, हरियाणा, दिल्ली व इतर राज्यांतील भाविकांसह सुमारे 8 ते 9 हजार नागरिक सहभागी होण्याची शक्यता आहे. 11 ते 15 नोव्हेंबरदरम्यान गुरुतागद्दी कार्यक्रम, नगरकीर्तन, धार्मिक सोहळे तसेच 15 नोव्हेंबर रोजी समारोप मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.याशिवाय राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची आंदोलने, मोर्चे तसेच विविध समाजांच्या आरक्षणविषयक मागण्या आणि इतर संघटनांच्या वतीने आंदोलने, रॅली व मोर्चे निघण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या आसपास शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू बाळगण्यास मनाई आहे.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

संपादकीय



विवेकदीप उजळी...

बाहेर सर्वत्र दिव्यांची रोषणाई आहे, काहींनी पारंपारिक आकाश कंदील आणि पणत्या प्रकाशमान केल्या आहेत, ग्राहकाच्या स्वागतासाठी दुकानं ओळीने झगमगताहेत, जागोजागी रांगोळ्यांचा सडा पडला आहे, फटाक्यांनी आसमंत दणाणतो आहे, घरात फराळाच्या पदार्थांनी डब्यांची पोटं टम्म फुगली आहेत, पाडवा - भाऊबीजेची खरेदी होते आहे, कॉर्पोरेट जगात भेटींचे पेटारे इकडून तिकडे फिरताहेत... आणि तरीही काही कोपरे अंधारलेलेच आहेत! दिव्यांचा सण साजरा करताना या अंधाऱ्या कोपऱ्यांची जाणीव सदासर्वदा ठेवायला हवी. महाराष्ट्राचं तर यावर्षी ते कर्तव्यच आहे. निम्म्यापेक्षा अधिक महाराष्ट्र दुष्काळाने काळोखला आहे. राज्याचा त्यापेक्षाही मोठा भाग पाणीटंचाईच्या भीतीने आत्ताच शहरला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तर सगळीकडेच भीषण आहे. अशा परिस्थितीत दिवाळी साजरी करायची आहे...

मी अविवेकाची काजळी| फेडूनि विवेक दीप उजळी| तै योगिया पाहे दिवाळी| निरंतर||

ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत दिवाळीतल्या दिव्याचा धर्म या भाषेत सांगितला आहे. विवेकरुपी दिव्याला आलेली अविचाराची काजळी झाडून दिवा प्रज्वलित होतो, तसा दिवा योगी (ज्ञानी) व्यक्तीच्या हृदयात अखंड तेवत असतो. दिवाळीचा प्रकाशही तसाच निरंतर राहायला हवा. विवेकाचं महत्त्व सांगताना ज्ञानदेवानी काजळी झडलेल्या ज्योतीची दिलेली जाणीव आज घडीला आपल्या समाजात सर्वाधिक महत्त्वाची आहे. या दिवाळीत जो प्रकाश जन्माला येईल, तो अविवेकाचा अंधार दूर करणारा, समाजमनात निरंतर तेवणारा प्रकाश असावा, ही प्रार्थना यावर्षी सर्वाधिक समर्पक ठरेल...

आपल्या समाजात पांडित्याची कमी नाही. बोलक्या विद्वानांचा तर 'सुकाळू' आहे. जगद्गुरु संत तुकोबारायांनी ज्यांच्याविषयी 'बोले तैसा चाले| त्याची वंदीन पाऊले||' असं म्हटलं होतं, तशा व्यक्ती समाजात किती आहेत? त्यांचाही दुष्काळच आहे. समाजाचा सद्सद् विवेक जागृत होण्यासाठी अशा सदाचरणी व्यक्तींची आपल्याला तीव्र गरज आहे. ज्ञानदेवांनी भाविक आणि त्याचा ईश्वर यातलं द्वैत संपण्याच्या स्थितीचं वर्णन करताना दिवा आणि दिव्याच्या प्रकाशाचा जो दृष्टांत दिला आहे, त्याचा संदर्भ घेऊन ज्ञानेश्वरीतील ओवींतूनच सांगायचं, तर

दीपा आणि प्रकाशा| एकवींकीचा पाडु जैसा| तो माझां ठायी तैसा| मी तयामाजीं||

वाचा आणि कृती यात कमीत कमी अंतर असलेल्यांची संख्या समाजात जसजशी वाढेल, तसतसं समाजाचं नैतिक बळ वाढत जाईल. दंभ आणि परोपदेशी पांडित्याने लदबदलेल्या अशा वांझ दीपस्तंभांतला अंधार उघडा पडेल आणि सामाजिक व्यवहार पारदर्शी होतील, तेव्हांच समाजाची पावलं उज्वल भविष्याकडे पडू लागतील. त्या पावलांना प्रकाशाची आस लागेल...

दिवाळीतली रोषणाई, फटाक्यांची पर्यावरणस्नेही आतषबाजी, पंचपक्वानाची मेजवानी करावीच. अंतःकरण आनंदाने उजळण्यासाठी तेही आवश्यकच आहे. ते उजळलं नाही आणि अंधारंच राहिलं, तर अंधाराचंच साम्राज्य अधिक दाट होईल! म्हणून ज्यांना शक्य आहे, त्यांनी ते करावंच. फक्त ते करताना ज्यांचे हात अशा दिवाळीपर्यंत पोहोचत नाहीत, त्यांची आठवण ठेवावी, एवढीच अपेक्षा. दुसऱ्याच्या आयुष्यातला अंधःकार मिटवण्याची जाणीव असेल, तरच या बाह्योपचारांपलिकडचा तुमच्या हृदयातला अंधकार नष्ट होईल. दिव्याचं बटन दाबलं, की प्रकाश पडतो. बाहेरचा अंधार मिटतो. आतल्या अंधाराचं काय? दिवाळी खरंतर त्यासाठी आहे. दिवाळीतले सगळे दिनविशेष याच संस्कारांचे आहेत. ते संस्कार झाले, तरच दिवाळी 'साजरी' झाली, असं म्हणता येईल. तुमची दिवाळी अशी संस्कारसंपृक्त, सार्थ; ज्ञानदेवांच्याच भाषेत 'दिपांच्या कोडी जैसे| एकची तेज सरिसे' - म्हणजे, दिवे कितीही असोत, त्यांच्या ज्योतीचे तेज समभावानेच भारलेले असते - हा साक्षात्कार देणारी ठरो, हीच मनःपूर्वक सदिच्छा...

दुष्काळाच्या दिवाळीत उपेक्षितांच्या घरात शांतिवनाच्या मदतीचा दिपक

१३६ कुटुंबांना नऊ महिन्यांसाठी घेतले दत्तक, किराणा साहित्य, आरोग्य आणि शैक्षणिक खर्चाची जबाबदारी शांतिवन उचलणार

मानूर प्रतिनिधी

यंदा अत्यल्प पावसामुळे शिरूर कासार तालुक्यात दुष्काळाचे भीषण संकट निर्माण झाले असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात तब्बल ८५ टक्क्यांनी घट झाल्याने अनेक कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या मदतीची प्रतीक्षा असताना आर्वी येथील शांतिवन सामाजिक संस्थेने मात्र सामाजिक बांधिलकी जपत दुष्काळग्रस्त आणि गरजू कुटुंबांना दिलासा देणारा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. तालुक्यातील तब्बल १३६ कुटुंबांना आगामी नऊ महिन्यांसाठी दत्तक घेऊन त्यांच्या अन्नधान्य, किराणा साहित्य, आरोग्य आणि शैक्षणिक खर्चाची जबाबदारी संस्थेने स्वीकारली आहे. अशा प्रकारे दुष्काळाच्या काळात १३६ कुटुंबांना आधार देणारी शांतिवन ही जिल्ह्यातील पहिली सामाजिक संस्था ठरली आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या उपेक्षित कुटुंबांची दिवाळी अंधारात जाऊ नये, या भावनेतून ७ नोव्हेंबर रोजी आर्वी येथील शांतिवन परिसरात १३६ कुटुंबांना अन्नधान्य व किराणा साहित्याचे वितरण करण्यात आले. ऐन सणासुदीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव उमटले.

आर्वी येथील शांतिवन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक नागरगोजे यांनी गेल्या २७ वर्षांपासून आपले संपूर्ण जीवन सामाजिक कार्यासाठी समर्पित केले आहे. समाजातील वंचित, उपेक्षित, अनाथ तसेच ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. शिक्षण, निवारा आणि सामाजिक पुनर्वसनाच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजूंच्या जीवनात आशेचा नवा प्रकाश निर्माण केला आहे.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शांतिवनने केवळ दिवाळीपुरती मदत न करता पुढील नऊ महिने या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. अन्नधान्याबरोबरच आरोग्य आणि मुलांच्या शैक्षणिक गरजांची जबाबदारी स्वीकारून संस्थेने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. शासनाच्या मदतीची वाट पाहणाऱ्या दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी शांतिवनचा हा उपक्रम केवळ किराणा साहित्याचे वाटप नसून संकटाच्या काळात माणुसकीचा दिलेला आधार आहे. दुष्काळाच्या काळोखात उपेक्षितांच्या घरात मदतीचा दिवा पेटविणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



तुमच्या घरातील माणूस म्हणून मी तुमच्या सोबत – दीपक नागरगोजे

■ दुष्काळाच्या संकटात गरजू कुटुंबांनी एकटे पडू नये, हीच आमची भूमिका आहे. शांतिवन ही केवळ सामाजिक संस्था नसून आपल्या कुटुंबाचा एक भाग आहे. तुमच्या घरातील माणूस म्हणून मी आणि शांतिवन परिवार प्रत्येक संकटात तुमच्या सोबत आहोत. केवळ आज किराणा साहित्य देऊन थांबायचे नाही, तर आगामी नऊ महिने अन्नधान्य, आरोग्य आणि मुलांच्या शिक्षणासाठी शक्य ती सर्व मदत करण्याचा आमचा प्रयत्न राहील. संकट कितीही मोठे असले तरी माणुसकीच्या बळावर त्याचा सामना करता येतो, असा विश्वास शांतिवनचे संस्थापक अध्यक्ष दीपक नागरगोजे यांनी व्यक्त केला.

दिवाळीनंतर जलसंधारणाच्या कामातही शांतिवनाचा पुढाकार

■ दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केवळ तात्पुरती मदत न करता कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज ओळखून शांतिवन संस्थेने दिवाळीनंतर जलसंधारणाच्या कामातही पुढाकार घेण्याचे नियोजन केले आहे. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत पाणी मुरवणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. दुष्काळग्रस्त कुटुंबांना अन्नधान्याचा आधार देतानाच भविष्यात पाणीटंचाईचे संकट कमी व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. संकटाच्या काळात मदतीचा हात आणि भविष्यासाठी जलसंधारणाची साथ, अशा दुहेरी भूमिकेतून शांतिवन सामाजिक बांधिलकी जपत आहे.

निराधार वृद्धांच्या मदतीला देखील शांतिवन धावणार

■ ज्या वृद्ध माता-पित्यांना मुले सांभाळत नाहीत, ज्यांचे हात-पाय थकल्याने स्वतःची दैनंदिन कामे करणेही शक्य होत नाही, अशा निराधार वयोवृद्धांना शांतिवनाच्या माध्यमातून घरपोच जेवणाचे डबे देण्याचा मानस आहे. केवळ अन्नदान नव्हे, तर वृद्धांच्या आयुष्याला आधार आणि मायेची ऊब देण्याचा हा संवेदनशील उपक्रम राबविण्याचा संकल्प शांतिवनचे संस्थापक दीपक नागरगोजे यांनी व्यक्त केला.

मूळ मुंबईकरांना मुंबईतच घरे मिळतील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ना. म. जोशी मार्ग बीडीडी पुनर्विकासातील ५५७ पात्र रहिवाशांना हक्काच्या सदनिका

मुंबई प्रतिनिधी

बीडीडी चाळींसह विविध पुनर्विकास प्रकल्पांच्या माध्यमातून मूळ मुंबईकर आणि दीर्घकाळापासून शहरात वास्तव्यास असलेल्या नागरिकांना त्याच ठिकाणी मोठे, प्रशस्त व हक्काचे घर देण्यासाठी राज्य शासन काम करत आहे. मुंबईची संस्कृती जपणाऱ्यांना घर दिल्याचं समाधान असून मूळ मुंबईकरांना मुंबईतून हद्दपार होऊ देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या तीन पुनर्वसन इमारतींमधील ५५७ पात्र रहिवाशांना सदनिकांचे चावी वितरण करण्यात आले. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात अकरा रहिवाशांना चावी व ताबा पत्राचे वाटप करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बीडीडी चाळींचा पुनर्विकास खासगी विकासकांऐवजी म्हाडामार्फत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे आशियातील नागरी पुनरुत्थानाचा हा सर्वांत मोठा प्रकल्प प्रत्यक्षात येत आहे. मुंबईची संस्कृती जपणाऱ्या चाळकऱ्यांना दर्जेदार घरे देताना नफा मिळविणे हा शासनाचा उद्देश नसून, अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य आहे. बीडीडी चाळीने अनेक बदल पाहिले असून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ तसेच मुंबईतील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कामगार चळवळींचा इतिहास अनुभवला आहे. बीडीडी चाळीला ऐतिहासिक वारसा असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळकांचे वास्तव्य या चाळीत होते.

बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. या प्रकल्पासाठी अनेक विकासकांकडून प्रस्ताव येत असले, तरी व्यापक स्वरूपाच्या या पुनर्विकासात येणाऱ्या अडचणींमुळे कामाला अपेक्षित गती मिळत नव्हती. केवळ खासगी विकासकांवर अवलंबून राहून हा प्रकल्प पूर्ण होणे कठीण असल्याचे लक्षात घेऊन म्हाडालाच विकासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर २०१७-१८ पासून पुनर्विकासाच्या कामाला सुरुवात झाली. मधल्या काळात काही अडथळे आले असले, तरी प्रकल्पाच्या कामात खंड पडू न देता त्याला पुन्हा गती देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.



बीडीडी चाळींमध्ये अनेक कुटुंबे सुमारे १६० चौरस फुटांच्या, मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या घरांमध्ये दोन ते तीन पिढ्यांसह राहत होती. या रहिवाशांना सर्व सुविधांनी युक्त ५०० चौरस फुटांची घरे उपलब्ध करून देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. नव्या सदनिकांमध्ये बैठक खोली, दोन शयनकक्ष आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, रहिवाशांच्या कुटुंबांच्या पुढील पिढ्यांसाठीही ही घरे भक्कम आधार ठरतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

बीडीडी चाळींमध्ये दीर्घकाळ वास्तव्य करणाऱ्या २०११ पूर्वीच्या पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना १५ लाख रुपयांत घरे देण्याचा निर्णय कायम आहे. २०११ नंतरच्या कटऑफमुळे पात्र न ठरणाऱ्या काही पोलीस कर्मचाऱ्यांनाही विशेष प्रकरण म्हणून बांधकाम खर्चात घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीदरम्यान निर्माण झालेल्या किमतीशी संबंधित तफावती आणि अडचणी दूर करण्यासाठी बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नवीन घरांची विक्री करू नका, पुढील पिढीसाठी जतन करा..

नव्या घरांच्या चाव्या मिळाल्यानंतर रहिवाशांनी ही घरे आपल्या कुटुंबाची संपत्ती समजून जपावीत. रहिवाशांनी नव्या घरांकडे कुटुंबाचे पिढ्यान्पिढ्यांचे वैभव म्हणून पाहावे. चांगली किंमत मिळत असली तरी घरांची विक्री न करता पुढील दोन-तीन पिढ्यांसाठी हा वारसा जतन करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

पुनर्विकास प्रकल्प वेळेत व पूर्ण दर्जात्मक व्हावेत - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वेळेत आणि पूर्ण गुणवत्तेसह पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले. पुनर्वसनाच्या सदनिकांच्या दर्जात अथवा नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. या सदनिका विक्रीसाठी उभारण्यात येणाऱ्या उच्च दर्जाच्या घरांप्रमाणेच गुणवत्तापूर्ण आणि सुविधांनी परिपूर्ण असाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून रहिवाशांना केवळ घर नव्हे, तर सर्वांगीण सुविधायुक्त परिसर उपलब्ध होतो. अशा पुनर्विकासातून मोकळ्या जागा, उद्याने, व्यायामशाळा, मुलांसाठी खेळण्याची जागा तसेच अन्य आवश्यक अशा एकूण २३ प्रकारच्या सुविधा उपलब्ध होतात, असे त्यांनी सांगितले.

ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळ पुनर्विकास आंदोलनादरम्यान तरुणांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी राज्य शासन कार्यवाही करेल. सर्वसामान्य नागरिक हा शासनाच्या विकासधोरणाचा केंद्रबिंदू असून, म्हाडा आणि अन्य शासकीय यंत्रणांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करावा, असे त्यांनी सांगितले.मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत आवश्यक बदल करून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि म्हाडाच्या प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. पूर्वी अनेक पुनर्विकास प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले होते. अशा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने सक्रिय भूमिका घेतली असून, नागरिकांना घरांसह प्रलंबित भाडे मिळावे, यासाठीही कार्यवाही करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.मुंबईतील नागरिकांना मोकळ्या जागा आणि दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी रेसकोर्सची १२५ एकर जागा आणि कोस्टल रोडलगतची सुमारे १५० एकर जागा मिळून जवळपास ३०० एकरांवर जागतिक दर्जाचे खुले उद्यान विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरी पायाभूत सुविधा, गृहनिर्माण आणि मोकळ्या जागा यांचा समतोल साधून मुंबईचा सर्वांगीण विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दुष्काळाच्या संकटाला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून, त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी नागरिकांनीही आपापल्या परीने मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. दिवाळीत नव्या घरात प्रवेश हा बीडीडी५५७ कुटुंबांसाठी हा दिवस आयुष्यभर स्मरणात राहणारा असल्याचे सांगत धनत्रयोदशी आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर हक्काच्या नव्या घरात प्रवेश करण्याची संधी मिळणे हा रहिवाशांसाठी दुहेरी आनंदाचा क्षण असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या गेल्या वर्षी बीडीडी चाळीच्या चावी वितरण कार्यक्रमाच्या आठवणी सांगितल्या.

रामलिंग वाघाला तातडीने जेरबंद करा; आ. सुरेश धस यांची मागणी

कडा : आष्टी तालुक्यातील देवळाली शिवारात वाघाच्या हल्ल्यात शेतकरी देविदास टकले यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची आमदार सुरेश धस यांनी गांभीर्याने दखल घेतली असून, नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी रामलिंग वाघाला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली आहे. वनविभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम राबवून संभाव्य मनुष्यहानी टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी म्हटले आहे.शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांना शेतीची कामे तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी दररोज शिवारात जावे लागते. मात्र, वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याने नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. विशेषतः शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे वनविभागाने या घटनेकडे नियमित कारवाई म्हणून न पाहता अत्यंत गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे आमदार धस यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी तालुक्यांतील जलाशय आणि तलावांमधील लागवडी योग्य गाळपेरा क्षेत्र चारा पिकांसाठी उपलब्ध - मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

मुंबई प्रतिनिधी

राज्य शासनाने दुष्काळी घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलाशय आणि तलावांमधील लागवडीयोग्य गाळपेरा क्षेत्र शेतकरी व पशुपालकांना अल्पकालीन चारा पिकांच्या लागवडीसाठी भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या क्षेत्रात मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, बरसीम, ओट आदी चारा पिके घेता येतील, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयाची अधिक माहिती देताना मंत्री राठोड म्हणाले, खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांच्या आधारे राज्यातील ३०४ तालुके दुष्काळी तालुके म्हणून घोषित केले आहेत. या भागातील जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी मृद व जलसंधारण विभागाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी तांत्रिक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचना लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, माजी मालगुजारी तलाव आदी जलसाठ्यांना लागू राहतील. पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी आरक्षित असलेल्या किंवा टँकर भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जलसाठ्यांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाला प्रथम प्राधान्य राहील. दुरुस्ती, गाळ काढणे किंवा पुनर्स्थापनेची कामे सुरू अथवा प्रस्तावित असलेले क्षेत्र गाळपेरा लागवडीसाठी उपलब्ध केले जाणार नाही.

जलाशयाची पूर्ण संचय पातळी आणि प्रत्यक्ष जलपातळी यांदरम्यान उघडे पडलेले लागवडीयोग्य क्षेत्रच गाळपेरा क्षेत्र म्हणून निश्चित केले जाईल. धरणाच्या मातीच्या भिंतीच्या जलाशयाकडील पायथ्यापासून किमान ५० मीटर, सांडवा व त्याच्या प्रवेशमार्गापासून किमान ३० मीटर तसेच विमोचक, इनटेक विहीर, जॅकवेल, गेज पोल आणि बेंचमार्कच्या सभोवतालचे किमान ३० मीटर क्षेत्र प्रतिबंधित राहील. पिण्याच्या पाण्याच्या उद्भव विहीर किंवा जॅकवेलच्या २०० मीटर परिसरात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर असलेल्या लागवडीला परवानगी मिळणार नाही.

महसूल, कृषी, पशुसंवर्धन आणि मृद व जलसंधारण विभागांचे अधिकारी संयुक्त सर्वेक्षण करून गाळपेरा उपलब्धता अहवाल तयार करतील. संबंधित कार्यकारी अभियंता हा अहवाल शासन निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसांत जिल्हास्तरीय समितीला सादर करतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रकल्पनिहाय उपलब्ध क्षेत्राचा आढावा घेऊन वाटपाला मान्यता देईल, लाभार्थी निवडेल आणि प्रति लाभार्थी क्षेत्राची कमाल मर्यादा निश्चित करेल.

चारा पिके प्रामुख्याने जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर घ्यावी लागतील. पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी आवश्यक पाणी आरक्षित केल्यानंतर अतिरिक्त पाणीसाठा असल्यासच कार्यकारी अभियंत्यांच्या लेखी परवानगीने संरक्षित सिंचन करता येईल. त्यासाठी ठिबक किंवा तुषार सिंचनाला प्राधान्य राहील. जलाशयाची पाणीपातळी मृतसाठ्यापर्यंत किंवा पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित पातळीपर्यंत पोहोचल्यानंतर सिंचनासाठी पाणी उपसा करता येणार नाही.

गाळपेरा क्षेत्रात मुरघासासाठी मका आणि ज्वारीला प्राधान्य देण्यात आले आहे. ऊस, फळपिके, बहुवार्षिक पिके तसेच अन्नधान्य किंवा नगदी पिके घेता येणार नाहीत. लाभार्थ्यांना पीक काढणी पूर्ण करून ३१ मे २०२७ पूर्वी जमीन विभागाच्या ताब्यात परत करावी लागेल. पाणीपातळी वाढल्यामुळे उभे पीक बुडाल्यास नुकसानभरपाई मिळणार नाही. जमिनीची मशागत कमाल २० सेंटीमीटर खोलीपर्यंत करता येईल. गाळ, माती, मुरूम किंवा वाळूचे उत्खनन व वाहतूक; नवीन विहीर, बोअरवेल, शेततळे, खड्डे किंवा चर खोदणे; तसेच बांधकाम, कुंपण, रस्ता, झोपडी किंवा वृक्षलागवड करण्यास मनाई राहील. धरणाच्या भिंतीवरून ट्रॅक्टर किंवा अवजड वाहनांची वाहतूक आणि पीक अवशेष जाळण्यासही परवानगी नसेल. अटींचे उल्लंघन झाल्यास कार्यकारी अभियंता परवानगी तात्काळ रद्द करतील आणि संरचना किंवा जलसाठ्याच्या नुकसानीचा खर्च संबंधित लाभार्थ्याकडून वसूल केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

तहसीलदार उपलब्ध क्षेत्र, भाडेपट्ट्याचा कालावधी, भाडेदर आणि अर्जासाठी किमान १५ दिवसांची मुदत गावचावडी, ग्रामपंचायत, तहसील कार्यालय आणि दवंडीद्वारे प्रसिद्ध करतील. इच्छुक व्यक्ती किंवा सहकारी संस्थांनी रहिवासी दाखला, जमीनधारणेचे उतारे किंवा भूमिहीन दाखला तसेच लागू असल्यास जात, प्रकल्पग्रस्त, संस्था नोंदणी आणि पशुधनविषयक कागदपत्रांसह संबंधित तहसीलदारांकडे अर्ज करावा, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६
sanday ८ November 2026

राजकीय विरोध बाजूला ठेवत आ.सुरेश धस यांचा माणुसकीचा हात

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आष्टी तालुक्यातील सायकड वस्ती येथील संपत सायकड आणि घुमरी पिंपरी येथील भानुदास परकाळे या दोन रुग्णांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. विशेष म्हणजे, संपत सायकड हे राजकीयदृष्ट्या आमदार सुरेश धस यांच्या विरोधी भूमिकेत राहिलेले असतानाही त्यांच्या अडचणीच्या काळात आमदार धस यांनी कोणताही राजकीय पूर्वग्रह न ठेवता मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे राजकारणापेक्षा माणुसकी मोठी असते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आष्टी तालुक्यात आला आहे.

सायकड वस्ती येथील संपत सायकड यांच्यावर अहिल्यानगर येथील न्युरान प्लस हॉस्पिटलमध्ये मेंदूविकारावरील उपचार सुरू आहेत. उपचारांचा खर्च मोठा असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली होती. ही बाब आष्टीचे माजी नगरसेवक संतोष मुरकुटे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संपत सायकड यांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मिळावी, अशी भावना आमदार



सुरेश धस यांच्याकडे व्यक्त केली. त्यानंतर आमदार धस यांनी कोणताही राजकीय विचार मनात न ठेवता तातडीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुंबई यांच्याकडून ५ नोव्हेंबर २०२६ रोजी संपत सायकड यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. यापैकी पहिल्या टप्प्यात २५ हजार रुपये संबंधित रुग्णालयाच्या बँक खात्यात जमा झाले असून, उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर उर्वरित २५ हजार रुपये वितरित करण्यात येणार आहेत.

संपत सायकड यांच्यासह भानुदास परकाळे यांना प्रत्येकी ५० हजारांची मदत मंजूर

त्याचबरोबर घुमरी पिंपरी (ता. आष्टी) येथील भानुदास परकाळे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठीही आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे आर्थिक मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावालाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी परकाळे यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाल्याचे अधिकृत मंजुरीपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या परकाळे कुटुंबालाही उपचारांसाठी मोठा आधार मिळाला आहे.

आमदार सुरेश (आण्णा) धस हे 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून गरजू आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या रुग्णांना शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत यांसारख्या विविध शासकीय योजनांचा लाभ गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून विशेष पाठपुरावा केला जातो.

या दोन्ही रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या कार्यालयातील रुग्णसेवक अमर वाळके, दत्ता हुले, विकास साळवे, विनोद वाघ आणि शरद रेडेकर यांनी विशेष सहकार्य केले. तसेच संपत सायकड यांना मदत मिळावी यासाठी माजी नगरसेवक संतोष मुरकुटे यांनी पुढाकार घेतला. राजकीय मतभेद, विरोधी भूमिका आणि पक्षीय समीकरणे बाजूला ठेवून संकटात सापडलेल्या रुग्णांच्या मदतीसाठी पुढे येणे, हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे. संपत सायकड यांच्या बाबतीत घेतलेल्या भूमिकेमुळे माणुसकीला राजकारणापेक्षा अधिक महत्त्व असल्याचा संदेश या मदतीतून अधोरेखित झाला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मिळालेल्या या आर्थिक मदतीमुळे दोन्ही रुग्णांच्या कुटुंबीयांना उपचारांसाठी दिलासा मिळाला आहे.



स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रेकॉर्डवरील आरोपी गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसांसह जेरबंद

बीड प्रतिनिधी

बीड शहरात दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपीस गावठी बनावटीचे पिस्तूल व दोन जिवंत काडतुसांसह ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत अंदाजे 42,000/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. 07/11/2026 रोजी पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे व पथकास गोपनीय बातमीदारा मार्फत करण दुर्गा भटनागर, वय 42 वर्षे, रा. इंदौर, मध्य प्रदेश, हा बीड शहरातील सागर हाइट्स परिसरात महाराजा ट्रॅव्हल्स कार्यालयासमोर पिस्तूलसह उभा असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने शिवाजी चौक परिसरात जाऊन त्यास ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडे निळसर रंगाच्या बॅगमध्ये गावठी बनावटीचे लोखंडी पिस्तूल मॅगझिनसह, दोन जिवंत काडतुसे मिळून आली.सदर आरोपीविरुद्ध यापूर्वी अमळनेर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 303/2020 अन्वये भारतीय दंड विधान कलम 307, 147, 148, 149, 324, 323, 504 तसेच शस्त्र अधिनियमातील कलम 3/25 अन्वये, तर जामखेड पोलीस ठाणे, जि. अहिल्यानगर येथे गु.र.नं. 115/2021 अन्वये कलम 26, 25 व 7 अन्वये गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. जप्त मुद्देमालामध्ये गावठी बनावटीचे पिस्तूल मॅगझिनसह अंदाजे 40,000/- व दोन जिवंत काडतुसे अंदाजे 2,000/- असा एकूण 42,000/- किमतीच्या मुद्देमालाचा समावेश आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम 3/25 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत काँवत, मा. प्रभारी पोलीस अधीक्षक बीड श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड श्री. राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोह अशोक दुबाले, पोह आनंद मस्के, पोह. सोमनाथ गायकवाड, पोह. बाळासाहेब सानप व चापो अंमलदार सिद्धेश्वर मांजरे यांनी केली.

धनंजय पवार यांना अखेरचा निरोप, कला-साहित्य क्षेत्रातील अवलिया व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड

लातूर प्रतिनिधी



महावितरणचे जनसंपर्क अधिकारी तथा कला, साहित्य आणि नाट्य क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे धनंजय पवार यांच्यावर शनिवारी लातूर येथील खाडगाव रोड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने मराठवाड्यातील कला-साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. लातूर शहरातील कपिल नगर परिसरातील त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, छत्रपती संभाजीनगर येथील नाट्यदिग्दर्शक मिलिंद महालिंगे, बाळकृष्ण धायगुडे यांच्यासह महावितरणचे अभियंते, अधिकारी, कर्मचारी तसेच धनंजय पवार यांच्यावर प्रेम करणारा मराठवाड्यातील मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वांनी साश्रू नयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला.

धनंजय पवार हे केवळ महावितरणचे जनसंपर्क अधिकारी नव्हते, तर कला, साहित्य आणि नाट्य चळवळीशी घट्ट नाळ जोडलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. नाट्यशास्त्र विषयातील संशोधन आणि पीएच.डी.च्या माध्यमातून त्यांनी आपली अभ्यासू वृत्ती जपली. मराठवाड्यातील नवोदित कलावंतांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. छत्रपती संभाजीनगर येथे 'अंकुर'सारख्या उपक्रमाला आकार देण्याबरोबरच जनरंग कला अकादमीच्या माध्यमातून मराठवाडा आणि राज्यस्तरावर एकांकिका स्पर्धांचे आयोजन करून त्यांनी नाट्य चळवळीला बळ दिले. 'पांथस्थ' या पाक्षिकाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचारांची पेरणी करण्याचे कामही त्यांनी केले.

अत्यंत धावपळीचे जीवन जगताना मधुमेहाशी त्यांचा संघर्ष सुरू होता. मात्र, समाजासाठी काहीतरी नवे करण्याची त्यांची ऊर्मी कायम होती. मनात अनेक स्वप्ने, संकल्पना आणि योजना असतानाच त्यांनी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला.त्यांच्या पश्चात वडील, भाऊ, बहिणी, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पवार कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, कला-साहित्य क्षेत्राने एक कल्पक, अभ्यासू आणि धडपडणारा कार्यकर्ता गमावला आहे. धनंजय पवार यांचे शरीर पंचतत्त्वात विलीन झाले मात्र त्यांनी कलाक्षेत्रात रुजवलेले विचार, जपलेली माणुसकी आणि त्यांच्या कार्याच्या आठवणी कायम स्मरणात राहतील.

बीड - पत्रकार अबूबकर चाऊस यांची खादिमिन



जामियतुल अरब फांउडेशनच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना महाराष्ट्र उर्दू अकादमीचे चेअरमन हसीन अख्तर, प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, जेष्ठ नगरसेवक सय्यद सादेक अली, भाजपा तालुका सरचिटणीस महादेव नागरगोजे, युनूस शेख आदी.

तामसात दिवाळी अंधारातच

हायमॅक्सची बत्ती गुलच, आमदारांच्या आदेशालाही केराची टोपली

तामसा (प्रतिनिधी)

तामसा शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवर बसविण्यात आलेले हायमॅक्स दिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे हायमॅक्स दिवे सुरू करण्याबाबत आमदारांनी संबंधित यंत्रणेला आदेश दिल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही दिव्यांची अवस्था 'जैसे थे'च असल्याने आमदारांच्या आदेशालाही केराची टोपली दाखवली जात आहे का ?, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तामसा येथील रस्ते सुरक्षा, स्पीड ब्रेकर, दिशादर्शक फलक तसेच बंद पथदिव्यांच्या प्रश्नावर ममता अर्जुन जोशी यांनी नागरिकांच्या वतीने उपोषणाचे आंदोलन केले होते. या आंदोलनाची सांगता करताना आमदारांच्या स्वीय सहाय्यकांनी संबंधित समस्या तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यात तामसा शहरातील बंद असलेले हायमॅक्स दिवे सुरू करण्याबाबतही आश्वासन देण्यात आले होते.मात्र, उपोषण मागे घेऊन काही दिवस उलटल्यानंतरही हायमॅक्स दिवे सुरू झाले नसल्याने



नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. मुख्य चौक, बाजारपेठ व रहदारीच्या ठिकाणी रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्याने वाहनचालक, पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे.एकीकडे तामसा शहरातून राष्ट्रीय महामार्ग व राज्य मार्गाची वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असताना दुसरीकडे रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था बंद असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. यापूर्वीही तामसा परिसरात रस्ते सुरक्षेच्या प्रश्नावर नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

आश्वासनाची पूर्तता कधी होणार ?

ममता जोशी यांच्या उपोषणाची सांगता करताना दिलेले आश्वासन केवळ आंदोलन थांबविण्यापुरतेच होते का ? आमदारांच्या आदेशानंतरही संबंधित यंत्रणा कारवाई का करत नाही ? हायमॅक्स दिवे दुरुस्त करण्यासाठी नेमकी कोणती अडचण आहे ? याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तामसातील हायमॅक्स दिवे तातडीने सुरू करून रात्रीची प्रकाश व्यवस्था सुरळीत करावी, अन्यथा पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा नागरिकांकडून देण्यात येत आहे.

ग्रामविकासात जिल्ह्याचा झेंडा; तीन ग्रामपंचायतींना पुरस्कार

लाडगाव-हिवरा जिल्ह्यात प्रथम ; जरंडी द्वितीय, पाटोदा तृतीय, एक कोटींचे पारितोषिक

छत्रपती संभाजीनगर

गावाच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न, लोकसहभाग आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास ग्रामीण भागाचे चित्र बदलू शकते, हे जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींनी दाखवून दिले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत जाहीर झालेल्या जिल्हास्तरीय पुरस्कारांमध्ये लाडगाव-हिवरा ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळविला आहे. सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीने द्वितीय, तर छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील पाटोदा ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक पटकावला. या तिन्ही ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५० लाख, ३० लाख आणि २० लाख रुपयांचे पारितोषिक मिळणार असून, जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने शुक्रवारी (ता. ६) पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींची घोषणा केली. या अभियानात केवळ कागदोपत्री कामगिरीला महत्त्व न देता गावातील प्रत्यक्ष विकासकामे, प्रशासकीय कार्यक्षमता आणि नागरिकांचा सहभाग यांचीही कसून पडताळणी करण्यात आली. सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्धी, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व अन्य योजनांचे अभिसरण, गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय आणि लोकसहभागातून लोकचळवळ उभारणे अशा प्रमुख निकषांवर ग्रामपंचायतींचे मूल्यांकन झाले.

जिल्ह्यातील तीन ग्रामपंचायतींच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., सभापती सचिन गरड, अनिता मोठे, मीनाक्षी पवार, बालाजी सोनटक्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे आणि साहेबराव चव्हाण यांनी पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचे अभिनंदन केले पुरस्कारासाठी ग्रामपंचायतींनी सादर केलेल्या स्वमूल्यांकन प्रस्तावांची विविध टप्प्यांवर छाननी करण्यात आली. ऑनलाइन नागरिक सेवा, ग्रामपंचायतीचा स्वतःचा महसूल वाढविण्याचे प्रयत्न, पाणीपुरवठा व स्वच्छता, वृक्षारोपण, रोजगारनिर्मिती आणि शासकीय योजनांचा लाभ ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्याबरोबरच लोकसहभागालाही गुणांकनात स्थान देण्यात आले.

गोळी भंडार, जनरल स्टोअरवर खुलेआम विक्रीचा आरोप, मानवी वस्तीत मोठ्या साठ्याबाबत प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

तामसा येथे फटाका विक्री अधिकृत की अनधिकृत ?

तामसा (प्रतिनिधी)

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तामसा शहरात फटाक्यांची विक्री सुरू झाली असून, गोळी भंडार,जनरल स्टोअर येथे फटाक्यांची खुलेआम विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, हा फटाक्यांचा साठा अधिकृत परवान्याअंतर्गत आहे की अनधिकृत पद्धतीने ठेवण्यात आला आहे, याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

तामसा शहरातील मानवी वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात फटाक्यांचे गोदाम असल्याचा आरोप होत असून, या ठिकाणी आवश्यक परवाना, साठवणुकीची क्षमता, अग्निसुरक्षा साधने, अग्निशमन विभागाची ना-हरकत तसेच इतर सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, हिंगोली शहरातील कपडागल्ली परिसरात मानवी वस्तीत फटाक्यांचा अनधिकृत



साठा करण्यात आल्याने भीषण दुर्घटना घडली होती. या घटनेत दोन नागरिकांचा मृत्यू झाला, तर अग्निशमन दलाच्या जवानांसह अनेक जण जखमी झाले. त्यानंतर हिंगोली प्रशासनाने रहिवासी भागातील फटाका साठ्यांची तपासणी सुरू करून बेकायदेशीर साठ्यावर कारवाई केली. जिल्हाधिकाऱ्यांनी बेकायदेशीर फटाका साठा जप्त करण्याचे निर्देश दिल्याचे वृत्त आहे.

हिंगोली प्रशासनाने फटाका विक्री व साठवणुकीसाठी परवाना, परवान्याची वैधता, साठ्याचे प्रमाण आणि अग्निसुरक्षा व्यवस्था तपासण्यावर भर दिला आहे. दाट लोकवस्ती, गर्दीची ठिकाणे आणि निवासी परिसरात फटाक्यांचा साठा ठेवण्याबाबतही प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर तामसा येथील गोळी भंडार जनरल स्टोअरमधील फटाका विक्रीला अधिकृत परवाना आहे का? परवानगीपेक्षा अधिक साठा तर नाही ना? मानवी वस्तीत मोठ्या प्रमाणात फटाके साठवण्यास कोणाची परवानगी आहे? तसेच संबंधित ठिकाणी अग्निसुरक्षेची पुरेशी साधने उपलब्ध आहेत का, याची महसूल, ग्रामपंचायत, पोलीस व अग्निशमन विभागाने संयुक्त तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

हिंगोलीसारखी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित फटाका विक्रेत्याकडे आवश्यक परवाने व सुरक्षा नियमांचे पालन असल्यास प्रशासनाने ते स्पष्ट करावे; अन्यथा नियमबाह्य साठा व विक्री आढळल्यास तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, तामसा पोलिसांकडून या फटाका विक्री व साठ्याची तपासणी करण्यात आली आहे का आणि संबंधित ठिकाणी कोणती परवानगी देण्यात आली आहे, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

जाहिर प्रगटन

मा. श्री. विजयकुमार बी. साळुंके, 6वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक 1798/2026 (मार्फत विधिज्ञ टेकडे वाय.एस.) अर्जदार :- 1) लक्ष्मीबाई शंकर वाघमारे, रा. अंधापुरी, ता. जि. बीड ह.मु. झरेकर पार्क जवळ, दिघी कॅम्प पुणे, 2) दिनेश शंकर वाघमारे, रा. सदर, 3) सुनिल शंकर वाघमारे, रा. सदर, 4) अनिल शंकर वाघमारे, रा. सदर, 5) राधा चंदू गालफाडे, रा. विठठल नगर, लांडेवाडी, भोसरी पुणे.

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे शंकर किसन वाघमारे हे/हया दिनांक २९/०३/२०२५ रोजी रा. अंधापुरी, ता. जि. बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ही मयताची पत्नी असुन अर्जदार कं. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार कं. ५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. मयताचे आई वडील पुर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांकः- ०२/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.पुढील तारीखः- १८/१२/२०२६

आदेशावरुन
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिर प्रगटन

मा. श्री पी.एस. घोडके, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज १७४२/२०२६ सखुबाई विरूध्द निरंक

अर्जदार : 1) सरखुबाई भा. गोरख पिंपळे, गाय-५९ वर्षे, व्यवसाय-घरदार, रु. पेंडगाई, पो. मालापुरी, ता.जी. बोली

२) गणेश पि. गोरखनाथ उर्फ गोरख पिंपळे, वय-३४ वर्षे, धंदा-शेती, रा. पेंडगाव. पो. आळापुरी, ता.जि. बीड विरुद्ध

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत,

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात गोरख पि. भानुदास पिंपळे रा. पेंडगाव, बीड, ता.जि. बीड यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत गोरख पि. भानुदास पिंपळे यांचा मृत्यु दिनांक १७.०८.२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदार क १ व २ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत गोरख पि. भानुदास पिंपळे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क १ व २ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत गोरख पि. भानुदास पिंपळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७.११.२०२६ आहे.

कनिष्ठ लिपीक

आदेशावरून,
अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

मुलांनो शिक्षणाची जिद्द ठेवा तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल : शाम गायकवाड

वडवणीत नाभिक समाजातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान

वडवणी/प्रतिनिधी





शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन असून समाजातील प्रत्येक मुलाने शिक्षणाची जिद्द, चिकाटी आणि मेहनत करण्याची तयारी ठेवली पाहिजे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण द्यावे आणि त्यांना प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी प्रोत्साहित करावे असे प्रेरणादायी आवाहन वडवणी पोलीस ठाण्याचे पीएसआय शाम गायकवाड यांनी केले.

वडवणी येथे प्रशासकीय सेवेत विविध पदांवर कार्यरत असलेल्या नाभिक समाजातील मान्यवरांचा शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव समिती, वडवणी यांच्या वतीने शाल, पुष्पहार आणि शिवरत्न जिवाजी महाले यांची प्रतिमा भेट देऊन सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. समाजातील गुणवंतांचा सन्मान करून नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी पोलीस ठाण्याचे पीएसआय शाम गायकवाड होते.प्रमुख पाहुणे म्हणून दुय्यम निबंधक अधीक्षक बालाजी गोरे, सिनिअर प्रा.रवि गोरे,मॅनेजर वैभव शिंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना पीएसआय शाम गायकवाड म्हणाले की, माझाही प्रवास अत्यंत खडतर परिस्थितीतून झाला आहे. मी देखील ग्रामीण भागातून आलो असून मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर आज या पदापर्यंत पोहोचलो आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील किंवा सर्वसामान्य परिस्थितीतील विद्यार्थ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे खचून जाऊ नये. मनात मोठे ध्येय ठेवून शिक्षण घेतल्यास यश निश्चित मिळू शकते.समाजातील एखादी व्यक्ती उच्च पदावर पोहोचली तर तिचा अभिमान बाळगण्याबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही तिच्याकडून प्रेरणा मिळाली पाहिजे. समाजातील प्रत्येकाने एकमेकांना प्रोत्साहन देत प्रगतीच्या प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

वडवणीतील समाजबांधवांनी दिलेले प्रेम आणि आपुलकी मी कधीही विसरणार नाही. समाजाची सर्वांगीण प्रगती व्हायची असेल तर प्रत्येक कुटुंबातील मुलांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे. समाजातील तरुणांनी मोठी स्वप्ने पाहावीत, मेहनत करावी आणि उच्च पदांवर जाऊन समाजाचे नाव उज्ज्वल करावे. स्वतःची प्रगती करताना समाजातील इतरांनाही सोबत घेऊन पुढे जाणे महत्त्वाचे आहे असे भावनिक आवाहन गायकवाड यांनी केले.

यावेळी उपस्थित नाभिक समाजबांधवांना शिवरत्न जिवाजी महाले यांची प्रतिमा भेट देण्यात आली. समाजातील प्रशासकीय अधिकारी व मान्यवरांचा सन्मान झाल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या उपक्रमातून समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळण्यासोबतच प्रशासकीय सेवेत जाण्याची नवी उमेद निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी शंतनु शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार जगदीश गोरे यांनी केले. प्रास्ताविक युवराज शिंदे यांनी केले तर आभार अमोल राऊत यांनी मानले.

या कार्यक्रमास वडवणी तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृष्णा खोऱ्याचे २१ टीएमसी पाणी उजणी मार्गे मांजरा धरणात आणण्यासाठी दिवाळी पाडव्याला एल्गार!

धनेगाव येथे १० नोव्हेंबरला महाबैठक



केज/प्रतिनिधी

मराठवाड्यातील दुष्काळी भागाचा पाणी प्रश्न कायम स्वरूपी सोडविण्या साठी कृष्णा खोऱ्यातील पाणी उजणी धरणामार्गे मांजरा धरणात आणण्याच्या मागणीला आता व्यापक जनलढ्याचे स्वरूप देण्याची तयारी सुरू झाली आहे.यंदा अत्यल्प पावसामुळे बीड,धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील तलाव,पाझर तलाव, विहिरींसह अनेक जलस्रोत कोरडे पडले आहेत.त्यामुळे शेतीच्या सिंचना सोबत च नागरिक आणि पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.या पार्श्वभूमीवर उजणी धरणातून मांजरा प्रकल्पासाठी २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर मंगळवार, दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मांजरा धरण विश्राम गृहासमोर,धनेगाव कॅम्प ता.केज येथे महाबैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मांजरा धरणाच्या पाण्यावर केज,कळंब, अंबाजोगाई,लातूर आणि रेणापूर या पाच तालुक्यांतील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागते, तर सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली येते.मात्र, पावसाची अनियमितता,पावसातील मोठे खंड आणि घटणारा जलसाठा यामुळे या भागातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दरवर्षी गंभीर होतो.मागील अनेक पिढ्यांनी दुष्काळाचे चटके सोसले आहेत.पुढील पिढीलाही पाण्यासाठी वणवण करावी लागू नये,यासाठी पावसावर अवलंबून न राहता पाण्याचा कायम स्वरूपी पर्याय निर्माण करण्याची गरज आहे.कृष्णा खोऱ्यातील पाणी मराठवाड्याकडे वळविण्या बाबत यापूर्वीही राज्य सरकारने नियोजन केले आहे.२००५ मध्ये कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजने अंतर्गत मराठवाड्या साठी पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पुढे या नियोजनात सुधारणा करून २३.६६ टीएमसी पाण्याची तरतूद करण्यात आली.मात्र, या योजनेची पूर्ण अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.त्यामुळे जुन्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यासह उजणीमार्गे मांजरा धरणासाठी २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर शासनाने ठोस निर्णय घ्यावा,अशी भूमिका या चळवळीच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे.

राजकीय मतभेद बाजूला ठेवून पाणी हक्कासाठी एकजूट

■ पाण्याचा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा व्यक्तीचा नसून परिसरातील शेतकरी आणि नागरिकांच्या भवितव्याशी संबंधित आहे.त्यामुळे सर्व राजकीय पक्षांचे नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी पक्षीय मतभेद व वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून एकत्र यावे. सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी संघटना, व्यापारी,व्यावसायिक आणि सामान्य नागरिकांनीही या लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे. या महाबैठकीत कृष्णा खोरेचे पाणी उजणी धरणातून बीड,लातूर व धाराशिव जिल्ह्यांसाठी २१ टीएमसी पाणी कालव्याद्वारे उपलब्ध करून देण्यास तातडीने मंजुरी देणे, मांजरा धरणाची उंची ०.५ मीटरने वाढल्या मुळे बाधित झालेल्या बुडीत क्षेत्रातील जमीनधारकांना मोबदला देणे सह अन्य मागण्यांवर चर्चा होणार आहे.तसेच शासनाकडे सामूहिक पाठपुरावा आणि पुढील आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार आहे.या बैठकी ला बीड,धाराशिव, लातूर जिल्ह्यातील खासदार,आमदार, पक्षाचे राजकीय नेते सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व नागरिकांनी तसेच शेतकरी,पत्रकार यांनी उपस्थित राहून आपला या लढ्याला पाठिंबा दर्शवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

फटाक्यांच्या आगीत गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट; तिघे गंभीर भाजले!



गेवराई : गेवराई शहरातील संजयनगर भागात दिवाळीसाठी आणलेल्या फटाक्यांना लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले. घरात जवळच असलेल्या गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाल्याने तिघे जण गंभीर भाजले. शनिवारी (दि. ७) रात्री सात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या स्फोटामुळे घरातील साहित्य जळून खाक झाले असून घराचेही मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय एक दुचाकीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

सुवर्ण लक्ष्मण चव्हाण, जनाबाई राठोड आणि अमोल राठोड (रा. संजयनगर, गेवराई) अशी जखमींची नावे आहेत. संजयनगर भागात त्यांचे पत्र्याचे घर असून दिवाळीनिमित्त आणून ठेवलेल्या फटाक्यांना शनिवारी रात्री अचानक आग लागली.

आगीची तीव्रता वाढत गेल्याने घरातील जवळच असलेल्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या भीषण स्फोटात घरात असलेले तिघे जण गंभीर भाजले. जखमींना गेवराईतील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.

केजच्या योगीता हॉस्पिटलमध्ये धिंगाणा घालून,डॉक्टरला धमकी देणे व विना परवानगी चित्रीकरण करणे पडले महागात..

साईनाथ घुले विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद

केज/प्रतिनिधी



केज येथील योगिता हॉस्पिटल आणि बाल रुग्णालयात आयुष्मान भारत योजनेमध्ये उपचाराचा लाभ मिळविण्यावरून झालेल्या वादातून डॉक्टरला दमदाटी करणे,शिवीगाळ करणे तसेच संवेदनशील क्षेत्रात विनापरवानगी मोबाईलद्वारे चित्रीकरण करून त्याचे सोशल मीडिया वर व्हायरल करून डॉक्टर व हॉस्पिटलची प्रतिमा मलीन केल्या प्रकरणी डॉ.दिनकर राऊत यांच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात साईनाथ घुले रा.शिरपूरा याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

डॉ.दिनकर रावसाहेब राऊत वय ४८ वर्षे, व्यवसाय डॉक्टर हे योगिता हॉस्पिटलचे बालरोग तज्ञ असून, आरोपी साईनाथ लक्ष्मण घुले रा. शिरपुरा,ता.केज याच्या विरोधात दि.२ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १ते १-३० वाजण्याच्या दरम्यान आणि त्यानंतर रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी दि.५ नोव्हेंबर २०२६ रोजी गुन्हा नोंदवला गेला आहे.

केज शहरातील वकीलवाडी भागात हनुमान मंदिरा जवळ डॉ.दिनकर राऊत व त्यांची पत्नी हेमा राऊत यांचे 'योगिता नर्सिंग होम व बाल रुग्णालय'आहे. दि.२ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १ ते १-३० वाजण्याच्या दरम्यान आरोपी साईनाथ घुले हा त्याचा मुलगा श्रेयस याला सर्दी व तापाच्या उपचारासाठी हॉस्पिटलच्या ओपीडी मध्ये घेऊन आला होता.तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला Acute Febrile Illness (Viral) असल्याचे सांगून रुग्णालयात दाखल करून उपचाराचा सल्ला दिला.उपचारास रुग्णाने चांगला प्रतिसाद दिल्यानंतर त्याच दिवशी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान डॉ राऊत हे वॉर्डमध्ये राऊंड घेण्यासाठी गेले असता,आरोपीने मुलाचे उपचार आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये करून देण्याचा आग्रह धरला.

सध्या सदर आजाराचा या योजनेच्या यादीत समावेश नसल्याने लाभ देता येणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे आरोपी संतापला. त्यानंतर त्याने आयसीयू समोरील पॅसेजमध्ये येऊन डॉक्टर व ऑन ड्युटी स्टाफला दमदाटी केली.मुलाचे उपचार योजनेत नाही बसविल्यास तुला बघून घेईन आणि हॉस्पिटल ची बदनामीही करीन, अशी धमकी देऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली होती.

वाद सुरू असताना आरोपीने बालरुग्ण कक्षात लहान मुले, त्यांच्या माता आणि महिला कर्मचारी असतानाही कोणाचेही न ऐकता विना परवानगी त्याच्या मोबाईलने चित्रीकरण करुन ही व डॉ.राऊत यांनी महिला व बालकांच्या गोपनीयते चा हवाला देत विरोध केला असता,आरोपीने त्यांच्याशी उद्धटपनाचे वर्तन केले. बिल न भरता आणि हॉस्पिटल स्टाफला न सांगता उपचाराची कागदपत्रे व फाईल घेऊन आरोपी आपल्या मुलासह गुपचूप निघून गेला.बालरोग कक्ष व आयसीयू जवळील संवेदनशील क्षेत्रातील व्हिडिओ विना परवानगी सोशल मीडियावर व्हायरल करून डॉक्टर व रुग्णालयाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी डॉ.दिनकर राऊत यांच्या फिर्यादीवरून गुरूवारी दि.५ नोव्हेंबर रोजी रात्री साईनाथ लक्ष्मण घुले रा.शिरपूरा याच्या विरुद्ध महाराष्ट्र वैद्यकीय सेवा- व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा- संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांनाप्रतिबंध) अधिनियम,२०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिते च्या विविध कलमा नुसार केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बाळसाहेब रोडे हे पुढील तपास करीत आहेत.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).